# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.08.2025** **वार-सोमवार**

---

**गणेशोत्सव**

चौदा विद्या आणि चौशष्ठ कलांचा अधिपती असलेल्या सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचं आगमन अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपलं आहे. येत्या बुधवारी श्रीगणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर गणेशाचं आगमन होत असून ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला गणेशोत्सवाची सांगता होईल. या वर्षी अकरा दिवस साजऱ्या होत असलेल्या या चैतन्य पर्वासाठी पुण्यासह संपूर्ण राज्यात उत्साहाचं वातावरण आहे. सार्वजनिक गणेश मंडळ, त्याचबरोबर घराघरातही गणरायाच्या स्वागताच्या तयारीची लगबग पहायला मिळत आहे. आकर्षक गणेश मूर्ती, सजावटीचं साहित्य, विविधरंगी विद्युत रोषणाईचं साहित्य, पूजा साहित्य, फुलं, आणि विविध प्रकारच्या आकर्षक मखरांनी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. गणेश मंदिरांना आणि मंदिरातील मूर्तींना नवी झळाळी दिली जात आहे, सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये पौराणिक, सामाजिक घटनांवर आधारित देखाव्यांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याच्या कार्यशाळा पुण्यात ठिकठिकाणी घेतल्या जात आहेत. विविध शाळा आणि गृहनिर्माण संस्थांमध्ये बालगोपाळांसह सर्व वयोगटातील नागरिक आकर्षक पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारत आहेत. गणेशोत्सवासाठी जिल्हा, महापालिका आणि पोलीस प्रशासनानं देखील चोख तयारी केली केली आहे. नागरिकांना गणेशोत्सवासाठी आपापल्या गावी जाता यावं यासाठी एसटी महामंडळानंही दरवर्षी प्रमाणे अतिरिक्त गाड्यांची सोय केली आहे. गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी निसर्गातही ऊन पावसाचा खेळ पहायला मिळत आहे.

**गणपती**

यंदा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आज आयुक्त शेखर सिंह यांनी विविध विभागांची बैठक घेतली. विसर्जन घाटांवर आवश्यक तेवढे कृत्रिम विसर्जन हौद तयार करा. पीओपी उत्सवमूर्ती आणि शाडू मातीच्या मूर्तीच्या विसर्जनाची वेगळी व्यवस्था करा. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सर्व घाटांवर गणेशमूर्ती संकलनाचे व्यवस्थापन करा. सर्व घाटांवर आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी जीवरक्षकांसह जलद प्रतिसाद पथके तैनात करा असे निर्देश आयुक्त सिंह यांनी यावेळी दिले.

**<u>वीजपुरवठा</u>**

गणेशोत्सवाच्या काळात गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरुपात वीजजोडणी देण्याचं महावितरणचं धोरण आहे. त्यासाठी अर्ज केल्यानंतर आवश्यक ती काळजी घेत मंडळांना अधिकृत वीजजोडणी मिळते. त्यामुळे बेकायदा वीजजोडणी घेऊन अपघाताला आमंत्रण देऊ नका असं आवाहन पुणे महापालिकेच्या विद्युत विभागाच्या मुख्य अभियंता मनीषा शेकटकर यांनी गणेश मंडळांना केलं आहे.

**<u>प्रभागरचना</u>**

आपल्या भागात चुकीच्या पद्धतीने प्रभाग रचना झाली असेल तर त्याबाबत आक्षेप नोंदवण्याचं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आलं आहे. या प्रभाग रचनेत काही ठिकाणी नैसर्गिक सीमारेषा ओलांडून दोन भाग एकाच प्रभागात जोडण्यात आले आहेत. अशा प्रभाग रचनेच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष निवडणूक आयोग आणि न्यायालयात आक्षेप नोंदवणार आहे. पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी याबाबत निवेदनं प्रसारित केलं आहे.

**<u>एशियाकॉनपरिषद</u>**

समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानाचा विकास केल्यामुळे लोक कल्याणकारी व्यवस्था निर्माण करण्यास मदत मिळते; असं मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त नुकतंच पुण्यात व्यक्त केलं. पाचव्या 'एशियाकॉन -२५' आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि आय ट्रिपल ई यांच्या सहयोगाने आयोजित या परिषदेसाठी सोळा देशांमधील २५६ शोधनिबंधांचं सादरीकरण करण्यात आलं.

**<u>विद्यापीठ</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पद्मश्री विठ्ठलराव विखें पाटील सहकार अध्यासन आणि राज्य सहकारी साखर संघानं; साखर उद्योगाच्या उत्कर्षासाठी अर्थकारणाची  दिशा, या विषयावर एक दिवसाच्या राज्यस्तरीय परिषदेचं आयोजन केलं आहे. येत्या शुक्रवारी, 29 ऑगस्ट रोजी होणाऱ्या या परिषदेमध्ये साखर उद्योगाच्या अर्थकारणा संबंधी अनेक विचारवंत मार्गदर्शन करणार आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. उद्याही शहर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**धरणसाखळी**

दरम्यान खडकवासला धरण साखळीत 97 टक्के पाणीसाठा झाला असून आज संध्याकाळी पाच वाजल्यापासून धरणातून 6 हजार 515 क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यास सुरुवात केल्याची माहिती पाटबंधारे उपविभागाचे उपविभागीय अभियंता मोहन भदाणे यांनी दिली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**